2023 III 02 - 1100
२०२३ . ०३ . ०२ - ११००

# N 801

Seat No.
बैठक क्र.

Time : 3 Hours **MARATHI FIRST LANGUAGE - 01** (M)

वेळ : ३ तास **मराठी प्रथम भाषा - ०१**

(REVISED COURSE)

Pages - 15 Total Marks : 80

पृष्ठे - १५ एकूण गुण : ८०

---

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :—**

(1) सूचनेनुसार आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

(4) विभाग-5 उपयोजित लेखन प्र. 5 (अ) (2) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र. 1 (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.


(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग-1 : गद्य

1. (अ) **उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) आकृती पूर्ण करा : 2

न्यू एज रोबो कंपनीने हॉटेल व्यवसायासाठी
तयार केलेले यंत्रमानव



न्यू एज रोबो कंपनीचा एजंट आम्हांला लॅपटॉपवर माहिती सांगत होता. हॉटेल व्यवसायाच्या गरजा लक्षात घेऊन वेटर, आचारी, स्वीपर, मॅनेजर असे वेगवेगळे यंत्रमानव म्हणजेच रोबो आम्ही बनवले आहेत. आम्ही बनवलेले रोबो हुबेहूब माणसाप्रमाणे दिसतात आणि वागतातही. एका रोबोची किंमत एक लाख रुपये आणि दर दोन महिन्यांना सर्व्हिसिंगचे अडीच हजार रुपये. लाखाची गोष्ट निघाल्याबरोबर सोमनाथ पटकन उठत मला म्हणाला, "राजाभाऊ, उठा आता, हे काही आपल्याला परवडणार नाही आणि दुसरी गोष्ट म्हणजे रोबो वेटरची सर्व कामं करणं कसं शक्य आहे ?" सोमनाथप्रमाणे माझाही त्या एजंटवर विश्वास बसत नव्हता. फक्त पाच मिनिटं.. माझं म्हणणं तुम्ही ऐकून घ्या. माझ्या सांगण्यावर तुमचा विश्वास बसत नाही; पण आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाचा हा चमत्कार आहे. मोठमोठ्या शहरांतील हॉटेलमध्ये अनेक रोबो काम करत आहेत. आमच्या रोबोबाबत वेटरच्या खाण्यापिण्याचा, पगाराचा, कामचुकारपणाचा विचार करण्याची गरज नाही. आमचा रोबो वेटर मानवी वेटरपेक्षा दुप्पट काम करेल आणि तुम्हांला दुप्पट कमाई करून देईल याची मी खात्री देतो." एजंटच्या शेवटच्या वाक्याने आम्ही विचार करू लागलो.

(2) उत्तरे लिहा : 2

(*i*) रोबो वेटरचा सर्व्हिसिंगचा कालावधी लिहा.

(*ii*) रोबो वेटरबाबत न्यू एज कंपनीच्या एजंटने दिलेली खात्री लिहा.

(3) **स्वमत :** 3

रोबो व माणूस यांच्या वागण्यातील ठळक फरक तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :

(1) कृती करा : 2

| 'नेहरू गिरिभ्रमण प्रशिक्षण केंद्रातील' अरुणिमाचे खडतर अनुभव लिहा. | |
|---|---|
| → | ______ |
| → | ______ |
| → | ______ |
| → | ______ |

पहिला टप्पा होता गिर्यारोहण प्रशिक्षणाचा. 'एम्स'मधून डिस्चार्ज मिळाला. साधारणपणे एखादा हात/पाय कापावा लागलेले पेशंटस दिवसेंदिवस अगदी महिनोन् महिने उठत नाहीत. मी दोनच दिवसांत उभी राहिले. एका पायात घोट्याची हाडे तुटल्याने रॉड घातलेला, ज्याच्या हाडांची जुळणी अजून पुरी व्हायची होती. दुसरा पाय म्हणजे मांडीपासून खाली कृत्रिम पाय बसवलेला. असा माझा अवतार नि जोडीला भाईसाब-आम्ही पोचलो ते थेट बचेंद्री पाल यांच्याकडे. बचेंद्रीजी म्हणजे एव्हरेस्ट सर करणारी पहिली महिला. त्याच एकमेव अशा होत्या, की ज्यांनी माझ्या ध्येयाचा आदर केला, मला प्रोत्साहन दिलं. त्या म्हणाल्या, "अरुणिमा, तू अशा परिस्थितीत इतका मोठा निर्णय घेतलास .................. तुला ठाऊक आहे, तुझ्या आतलं एव्हरेस्ट तू केव्हाच सर केलं आहेस. आता तुला एव्हरेस्ट सर करायचं आहे ते फक्त स्वत:ला सिद्ध करायला, जगाला तू कोण आहेस हे दाखवून दयायला......!"

'नेहरू गिरिभ्रमण प्रशिक्षण केंद्र' बहुधा आशिया खंडातील सर्वोत्तम असावं. इथे माझे दीड वर्षांसाठी खडतर प्रशिक्षण सुरू झाले. छोटे पण बऱ्यापैकी धोकादायक पर्वत चढणे, जवळपास मरणप्राय कठीण अनुभव, ध्येयापासून विचलित करू पाहणारे कष्टदायी प्रशिक्षण यांतून मी तावून सुलाखून निघत होते.

(2) एका शब्दात उत्तर लिहा : 2

(*i*) एव्हरेस्ट सर करणारी पहिली महिला.

(*ii*) अरुणिमाबरोबर बचेंद्री पाल यांच्याकडे जाणारी व्यक्ती.


(3) **स्वमत :** 3

'प्रत्येकामध्ये एक जिद्दी अरुणिमा असते', याबाबत तुमचे विचार स्पष्ट करा.

**अपठित गद्य**

(इ) **उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(1) आकृतिबंध पूर्ण करा : 2



माणूस, त्याचा सामाजिक परिसर व त्याच्या सभोवतालचा निसर्ग यांतील संवाद शिक्षणामुळे साधता आला पाहिजे, हा कर्मवीरांचा आग्रह होता. भारत हा खेड्यांचा आणि खेडूतांचा देश आहे. खेडी ही निसर्गाला अधिक जवळची आहेत. व्यक्तीचे पौरुष, प्रतिकारक्षमता व उपक्रमशीलता यांचा विकास होतो तो माणूस आणि निसर्ग यांच्या सहयोगातून.

कर्मवीरांनी हे जीवन रहस्य जाणले आणि शिक्षणाचा मोहरा खेड्याकडे वळविला. संस्थानिकांचे वाडे, वारकऱ्यांच्या धर्मशाळा, वाड्या आणि वस्त्यांवरची घरकुले हीच आपली आश्रयस्थाने समजून कार्याला आरंभ केला. पुढे-पुढे शाळांच्या वास्तू उभ्या राहिल्या. शक्य असेल तेथे शाळेला जोडून शेती संपादन करण्यात आली. शेतात विहिरी खोदण्यात आल्या. हे सर्व विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून घडवून आणले.

अंगमेहनतच गरिबांची दौलत. 'कमवा आणि शिका' या शिक्षण-क्षेत्रातील मंत्राचे द्रष्टे कर्मवीर हेच होते.

(2) चौकटी पूर्ण करा : 2

(*i*) कर्मवीरांच्या मते गरिबांची दौलत [ ]

(*ii*) कर्मवीरांनी शिक्षण क्षेत्राला दिलेला मंत्र [ ]

## विभाग-2 : पद्य

2. (अ) **कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) कवितेच्या आधारे खालील विधाने योग्य की अयोग्य ते लिहा : 2

(*i*) सकारात्मक राहा.

(*ii*) उतावळे व्हा.

(*iii*) खूप हुरळून जा.

(*iv*) संवेदनशीलता जपा.

खोद आणखी थोडेसे
खाली असतेच पाणी
धीर सोडू नको, सारी
खोटी नसतात नाणी.

घट्ट मिटू नये ओठ
गाणे असते गं मनी
आर्त जन्मांचे असते
रित्या गळणाऱ्या पानी.

मूठ मिटून कशाला
म्हणायचे भरलेली
उघडून ओंजळीत
घ्यावी मनातली तळी.

| |
|---|
| झरा लागेलच तिथे<br>खोद आणखी जरासे<br>उमेदीने जगण्याला<br>बळ लागते थोडेसे! |

(2) कवितेतील खालील संकल्पना आणि त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा. 2

| कवितेतील संकल्पना | संकल्पनेचा अर्थ |
|---|---|
| (*i*) मूठ मिटून कशाला म्हणायचे भरलेली | (*i*) मनातील सामर्थ्य व्यापक बनवावे. |
| (*ii*) उघडून ओंजळीत घ्यावी मनातली तळी | (*ii*) सगळे लोक फसवे नसतात. |
| | (*iii*) भ्रामक खोट्या समजुती बाळगू नयेत. |

(3) खालील पद्यपंक्तींचा सरळ अर्थ तुमच्या शब्दांत लिहा : 2

खोद आणखी थोडेसे
खाली असतेच पाणी
धीर सोडू नको, सारी
खोटी नसतात नाणी

(4) **काव्यसौंदर्य :** 2

'झरा लागेलच तिथे, खोद आणखी जरासे', या ओळीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

(आ) खालील मुद्द्यांच्या आधारे खालीलपैकी कोणत्याही *एका* कवितेसंबंधी खालील कृती सोडवा : 3.

| | 'भरतवाक्य' ← किंवा → 'वस्तू' | |
|---|---|---|
| (*i*) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री – | ............... | ............... |
| (*ii*) प्रस्तुत कवितेचा विषय – | ............... | ............... |
| (*iii*) प्रस्तुत कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे – | ............... | ............... |

1

1

4.

(इ) खालील पंक्तीचे रसग्रहण करा :

'घामातुन मोती फुलले
श्रमदेव घरी अवतरले
घर प्रसन्नतेने नटले
हा योग जीवनी आला साजिरा'

## विभाग-3 : स्थूलवाचन

3. खालीलपैकी कोणत्याही *दोन* कृती सोडवा : 6

(1) व्युत्पत्तीकोशाचे कार्य लिहा.

(2) 'बालसाहित्यिका-गिरिजा कीर' या पाठाच्या आधारे 'मधूचे कृत्य संवेदनशील मनाचे उत्तम लक्षण आहे' या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

(3) 'प्रेम आणि आपुलकी' या गोष्टींमुळे भरकटलेली मुले पुन्हा स्वगृही जाण्यास तयार होतात, हे 'वीरांगना' या पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

## विभाग-4 : भाषाभ्यास

4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :

(1) समास :

योग्य जोड्या लावा : 2

| सामासिक शब्द | समासाचे नाव |
|---|---|
| (*i*) भाजीपाला | द्विगू समास |
| (*ii*) कमलनयन | समाहार द्वंद्व समास |
| | कर्मधारय समास |

(2) **शब्दसिद्धी :**

खालील तक्ता पूर्ण करा : 2

(भरदिवसा, लाललाल, दुकानदार, खटपट)

| प्रत्ययघटित शब्द | उपसर्गघटित शब्द | अभ्यस्त शब्द |
|---|---|---|
| | | |

(3) **वाक्प्रचार :**

खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा : 4

(*i*) कान देऊन ऐकणे

(*ii*) कसब दाखवणे

(*iii*) आनंद गगनात न मावणे

(*iv*) तगादा लावणे.

(आ) **भाषिक घटकांवर आधारित कृती :**

(1) **शब्दसंपत्ती :**

(1) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा : 1

(*i*) डोळा –

(*ii*) वृक्ष –

(2) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : 1

(*i*) वास्तव ×

(*ii*) योग्य ×

(3) खालील शब्दांचे वचन ओळखा : 1

(*i*) वळणा –

(*ii*) मुलगा –

(4) खालील शब्दातील अक्षरांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा : 1

विचारसरणी

(2) **लेखननियमांनुसार लेखन :** 2

खालील वाक्यातील लेखननियमांनुसार चुकीने शब्द ओळखून दुरुस्त करा. (कोणतीही **दोन** वाक्ये सोडवा) :

(*i*) गीर्यारोहणाने मला खुप महत्त्वाचे धडे दिले.

(*ii*) आलिकडे एक सुरेख परदेशी सोनेमा पाहिला.

(*iii*) तोचं अवसान पाहून त्यानं दिपालीला तेथेच टाकलं.

(*iv*) सरपण नीट नसलं, कि गड्यांची फजीती होते.

(3) **खालील वाक्यात योग्य विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा :** 1

मी एवढं सगळं सांगितलं कारण मी तुम्हांला खूप जवळून पाहिलंय

(4) **पारिभाषिक शब्द :** 1

खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा :

(*i*) Workshop

(*ii*) Exchange

## विभाग-5 : उपयोजित लेखन

5. (अ) **खालील कृती सोडवा :**

(1) **पत्रलेखन :**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही **एक** कृती सोडवा :

वाचाल तर वाचाल !

मनोज पुस्तकालय-

69/314 आनंद नगर, अकोला

दुकानाच्या वर्धापन दिनानिमित्त

दि. 8 डिसेंबर रोजी खास सवलत

| कोणत्याही पुस्तकावर 20% सवलत | वेळ ↓ | 2000 रु. च्या खरेदीवर एक पुस्तक मोफत |
|---|---|---|

स. 9.00 ते रात्री 8.00 वा.

सोमवार बंद.

संपर्क – manojakola@gmail.com

श्रेया/श्रेयस इनामदार

| विद्यार्थी प्रतिनिधी त्या नात्याने शाळेतील ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र दुकानाच्या व्यवस्थापकांना लिहा. | **किंवा** | संबंधित निवेदनाची माहिती देणारे पत्र तुमच्या मित्र/मैत्रिणीला लिहा. |
|---|---|---|

किंवा

(2) विभाग-1 : गदय (इ) [प्र. क्र. 1 (इ)] मधील अपठित गद्य उताऱ्याचा एक-तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) **खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :** 10

(शब्दमर्यादा 60 ते 90 शब्द)

(1) **जाहिरातलेखन :**

खालील मुद्द्यांचा आधारे 'कला-छंद वर्ग' याची आकर्षक जाहिरात तयार करा.

सृजन कला-छंद वर्ग | दिनांक | वेळ | कालावधी

वैशिष्ट्ये | संपर्क

आयोजक

(2) **बातमीलेखन :**

खालील विषयावर बातमी तयार करा :

8 मार्च 'जागतिक महिला दिनानिमित्त' शाळेत 'माता-पालक मेळावा' व विविध स्पर्धांचे आयोजन. पालकांचा उदंड प्रतिसाद.

(3) **कथालेखन :**

खालील अपूर्ण कथा पूर्ण करून लिहा :

(दिलेली अपूर्ण कथा लिहून घेण्याची गरज नाही.)


पाडळी गावातील सखू आपल्या रानातला भाजीपाला घेऊन बाजाराला गेली. शेतातल्या कोवळ्या, ताज्या भाज्या विकताना दिवस कधी संपला तिला कळलेच नाही. अजूनही थोडी भाजी शिल्लक होती. भाव कमी करून तिने ती विकली व सर्व साहित्य गोळा करून लगबगीने घराकडे निघाली. अर्ध्यारस्त्यात जाईपर्यंत काळोख दाटून आला. एक हुरहुर तिच्या मनात दाटून आली; पण नेटाने ती चालत होती. पावले भरभर उचलत होती. एवढ्यात तिला काळोखात सायकलचा आवाज आला. ती थबकली आणि ..........................

(इ) **लेखनकौशल्य :** 8

खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही **एक** कृती सोडवा.


(1) **प्रसंगलेखन :**

'अकस्मात पडलेला पाऊस' या विषयावर खालील मुद्दे विचारात घेऊन लेखन करा.




(2) **आत्मकथन :**

दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा.




(3) **वैचारिक :**

'प्रदूषण - एक समस्या' या विषयावर तुमचे विचार लिहा.